दैनिक **राज्य लोकतंत्र**

नवी दिशा... नवे विचार...

आरएनआय : MAHMAR/2021/85884 | रविवार, २१ जून २०२६ | वर्ष - १ | अंक -२६६ | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड


### आजचे पंचांग

**रविवार, २१ जून २०२६**
चार, सकाळी ०७:२६, सकाळी ०९:०७ ; लभ, सकाळी ०९:०७, सकाळी १०:४८ ; अमृत (वार वेला), सकाळी १०:४८, दुपारी १२:२८ ; काळ (काल वेला), दुपारी १२:२८,
सूर्य आणि चंद्र वेळ
सूर्योदय – सकाळी ६:०३
सूर्यास्त – संध्याकाळी ७:०९ वाजता

### शिरूर पंचायत समितीमध्ये गोंधळ घालणाऱ्यावर गुन्हा

**शिरूर :** शिरूर पंचायत समिती कार्यालयामध्ये येऊन गटशिक्षण अधिकारी व अन्य शासकीय अधिकाऱ्यांना अरेरावी, शिवीगाळ करत गोंधळ घालणाऱ्या एकावर शासकीय कामात अडथळा आणल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. राहुल सुरेश वाळके ( रा. करंजावणे, ता. शिरूर, जि. पुणे) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकाराबाबत पंचायत समितीचे कनिष्ठ प्रशासन अधिकारी प्रदीप हनुमंत पोटघन यांनी शिरूर पोलिस स्टेशन येथे तक्रार दाखल केली.

# 'जंतर-मंतर'वर पोलीस विरुद्ध आंदोलक!

## ॲक्शन घेताच संघर्ष वाढला, दिपकेचा मैदान सोडण्यास नकार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** नीट पेपरफुटीसह इतर परीक्षांमध्ये झालेल्या गैरप्रकार प्रकरणी केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा घेण्यात यावा, अशी मागणी कॉक्रोच जनता पार्टीने केली आहे. अभिजीत दिपकेच्या नेतृत्वाखाली दिल्लीतील जंतर-मंतर मैदानावर नव्याने आंदोलन सुरू असून, पोलिसांनी आंदोलन करण्यास अधिकची परवानगी नाकारत मैदान रिकामे करण्याची कारवाई सुरू केली. पण, अभिजीत दिपकेंनी मैदान रिकामे करण्यास नकार दिल्याने पोलीस आणि आंदोलक आमने-सामने आल्याची स्थिती निर्माण झाली.

राजीनाम्याच्या मागणीसाठी कॉक्रोच जनता पार्टीच्या नेतृत्वाखाली जंतर-मंतर मैदानावर आंदोलन सुरू आहे. या आंदोलनासाठी परवानगी वाढवून द्यावी, अशी मागणी पोलिसांकडे करण्यात आली होती; मात्र पोलिसांनी परवानगी नाकारली आहे. त्यानंतर पोलिसांनी आंदोलकांना हटवण्याची कारवाई सुरू केली.

ताज्या माहितीनुसार, दिल्ली पोलीस दलाचे जवान जंतर-मैदानावर पोहोचले आहेत. मोठ्या संख्येने पोलीस बळ बोलवण्यात आले असून, पोलिसांनी मैदानावर जमलेल्या आंदोलकांना हटवण्याचे काम सुरू केले आहे. पोलिसांकडून सक्तीने मैदान रिकामे करण्याचे काम सुरू असले, तरी कोणत्याही प्रकारचा बळाचा वापर केला गेला नाही.

**अभिजीत दिपकेचा**




**हटण्यास नकार**

पोलिसांकडून गर्दी हटवण्याचे काम सुरू झाले असले, तरी अभिजीत दिपकेने मैदान सोडण्यास नकार दिला आहे. त्यामुळे इथे काहीसा तणाव निर्माण झाला आहे. अभिजीत दिपके आणि इतर विद्यार्थी संघटनांचे विद्यार्थी मैदानात ठाण मांडून बसले आहेत.

पोलिसांकडून कारवाई सुरू करण्यापूर्वी अभिजीत दिपकेने आवाहन केले होते की, देशभरातून विद्यार्थी आले आहेत आणि त्यांच्या भविष्याचा विषय आहे. त्यामुळे पुढेही आंदोलन करण्याची परवानगी पोलिसांनी द्यावी.

अभिजीत दिपके सरकारला इशारा म्हणाला की, 'चर्चेचा मार्ग खुला आहे, पण आमची एक अट आहे की, केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी तात्काळ राजीनामा द्यायला हवा. जर पोलिसांनी आम्हाला इथून बळजबरीने हटवण्यासाठी अटक केली, तर अटक होणारा मी पहिला व्यक्ती असेल.''

## कोल्हापुरात १,५०० कोटींचा संयंत्र प्रकल्प उभारणार;

### साखर कारखान्यांसाठी अमित शहा यांनी केली मोठी घोषणा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**इचलकरंजी :** केंद्रीय मंत्री अमित शाह आज कोल्हापूर जिल्ह्याच्या दौऱ्यावर होते. आज त्यांनी इचलकरंजी येथील एका भव्य कार्यक्रमाला उपस्थिती लावली, यावेळी त्यांनी कोल्हापूर आणि पश्चिम महाराष्ट्रातील सहकार क्षेत्रासाठी मोठी घोषणा केली. कोल्हापूर जिल्ह्यात सहकार क्षेत्राला बळकटी देण्यासाठी तब्बल १,५०० कोटी रुपये खर्चाचा अत्याधुनिक संयंत्र प्रकल्प उभारला जाणार असल्याचे त्यांनी जाहीर केले.

या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाची उभारणी केंद्र सरकारकडून सुरू केली जाईल, असे अमित शाह यांनी स्पष्ट केले. तसेच, या प्रकल्पाच्या उभारणीसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तात्काळ सहमती दर्शवली असल्याचेही त्यांनी नमूद केले. यामुळे या प्रकल्पाच्या कामाला वेग मिळणार आहे.

पश्चिम महाराष्ट्रातील जे साखर कारखाने आर्थिक किंवा तांत्रिक कारणांमुळे इथेनॉल, कॉम्प्रेस्ड बायोगॅस, सायट्रिक ॲसिड आणि इतर उप-उत्पादनांची स्वतंत्रपणे निर्मिती करू शकत नाहीत, त्यांच्यासाठी हा प्रकल्प जीवनदान ठरणार आहे. अमित शाह म्हणाले, ''महाराष्ट्रातील अनेक साखर कारखाने इथेनॉल, सीबीजी आणि त्यापुढील रासायनिक प्रक्रिया करून सायट्रिक ॲसिडची निर्मिती स्वतंत्रपणे करू शकत नाहीत. त्यांच्यासाठी केंद्र सरकार कोल्हापूर जिल्ह्यातच एक सहकारी संयंत्र प्रकल्प उभारणार आहे. या १,५०० कोटी रुपयांच्या प्रकल्पात सर्व संबंधित साखर कारखान्यांची उप-उत्पादने तयार केली जातील आणि त्यातून मिळणारा सर्व नफा परत त्याच कारखान्यांना दिला जाईल, असेही त्यांनी सांगितले.

यावेळी अमित शाह यांनी सहकारी कारखान्यांसाठी यंत्रसामग्री आणि औद्योगिक क्षेत्राशी संबंधित आणखी एका १,५०० कोटी रुपयांच्या प्रकल्पाची घोषणा केली. पुणे येथील 'नॅशनल हेवी इंजिनिअरिंग'शी संबंधित १,५०० कोटी रुपये खर्चून संयंत्र प्रकल्प पुन्हा सुरू केला जाईल. या प्रकल्पातून डेअरी, इथेनॉल, सायट्रिक ॲसिड आणि शेणापासून सीबीजी गॅस बनवण्यासाठी लागणारी अत्याधुनिक यंत्रे तयार केली जातील.

## कोथरूडमध्ये मोठी कारवाई; सराईत गुन्हेगारांकडून ४ पिस्टल आणि १२ जिवंत काडतुसे जप्त

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** पुण्यातील कोथरूड पोलिसांनी मोठी कारवाई करत तीन आरोपींकडून ४ गावठी पिस्टल आणि १२ जिवंत काडतुसे जप्त केली आहेत. कमिन्स कंपनी परिसरात संशयास्पद हालचाली करणाऱ्या तरुणांवर कारवाई करत कोथरूड पोलिसांनी हा शस्त्रसाठा हस्तगत केला. या प्रकरणी तिघांना अटक करण्यात आली असून त्यांनी ही शस्त्रे मध्य प्रदेशातून आणल्याची कबुली दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पोलीस अंमलदार शकील पठाण आणि संजय दहिभाते यांना खबऱ्यामार्फत माहिती मिळाली होती की, कमिन्स कंपनीजवळ लाल रंगाचा शर्ट आणि काळ्या रंगाची नाईट पॅन्ट घातलेल्या एका व्यक्तीच्या कमरेला पिस्तूल आहे. माहिती मिळताच कोथरूड पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अरुण घोडके यांनी पथकासह घटनास्थळी धाव घेतली.



यावेळी संशयास्पद अवस्थेत थांबलेल्या दोन व्यक्तींची झडती घेतली असता निशांत रमेश सातपुते (वय २२, रा. एरंडवणे) याच्या कमरेला एक गावठी पिस्तूल आणि खिशात तीन जिवंत काडतुसे आढळून आली. त्यानंतर निशांत सातपुते आणि संकेत प्रकाश निवंगूने (वय २४, रा. वारजे माळवाडी) यांना ताब्यात घेण्यात आले. दोघांविरोधात कोथरूड पोलीस ठाण्यात आर्म ॲक्टनुसार गुन्हा दाखल करून अटक करण्यात आली.

पोलीस कोठडीत चौकशीदरम्यान संकेत निवंगूने याने त्यांचा आणखी एक साथीदार श्रावण नितीन पवार ( वय २४ रा. श्रमिक वसाहत, वारजे) याच्याकडे आणखी शस्त्रसाठा असल्याची माहिती दिली. यानंतर पोलिसांनी श्रावण पवार याला ताब्यात घेत त्याच्या ॲक्टिव्हा दुचाकीची झडती घेतली असता ३ गावठी पिस्टल आणि ९ जिवंत काडतुसे आढळली. अशाप्रकारे तिन्ही आरोपींकडून एकूण ४ गावठी पिस्टल आणि १२ जिवंत काडतुसे हस्तगत करण्यात आली. प्राथमिक चौकशीत आरोपींनी ही शस्त्रे मध्य प्रदेशातील उमरटी गावातून आणल्याची कबुली दिली आहे. मात्र ही पिस्तुले पुण्यात कोणत्या उद्देशाने आणण्यात आली होती, त्यांचा वापर कोणत्या गुन्ह्यासाठी होणार होता आणि या शस्त्रांच्या पुरवठ्यामागे आणखी कोणाचे नेटवर्क आहे का, याचा तपास कोथरूड पोलीस करत आहेत.

## एससी आरक्षणातील उपवर्गीकरणाला विरोध; राज्यभरातील संघटना नागपुरात एकवटल्या

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नागपूर :** अनुसूचित जातींच्या आरक्षणातील उपवर्गीकरणाच्या विरोधात शनिवारी नागपुरातील दीक्षाभूमी येथून जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य मोर्चा काढण्यात आला. संविधान चौकात या मोर्चाचेसभेत रूपांतर झाले. हा मोर्चा विदर्भस्तरीय असला तरी मोर्चात राज्यभरातील विविध सामाजिक संघटना, विद्यार्थी, युवक आणि कर्मचारी संघटनांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत.

अनुसूचित जातींच्या घटनात्मक आरक्षणाला धक्का पोहोचविणाऱ्या कोणत्याही प्रयत्नांच्या निषेधार्थ हा मोर्चा काढण्यात आल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले. अनुसूचित जाती या आधीच संविधानाच्या अनुसूचीमध्ये समाविष्ट आणि वर्गीकृत करण्यात आल्या असून, त्यामध्ये उपवर्गीकरण करण्याचा प्रयत्न हा सामाजिक न्यायाच्या मूलभूत तत्त्वांच्या विरोधात आहे.

केंद्र व राज्य सरकारने अनुसूचित जातींच्या आरक्षणामध्ये कोणत्याही प्रकारचा हस्तक्षेप करू नये, तसेच उपवर्गीकरणाचा निर्णय तत्काळ मागे घ्यावा, अशी प्रमुख मागणी या माध्यमातून करण्यात आली. यावेळी विविध वक्त्यांनी अनुसूचित जातींचे घटनात्मक हक्क, आरक्षणाचे संरक्षण आणि सामाजिक न्यायाच्या प्रश्नांवर आपली भूमिका स्पष्ट केली.

मोर्चाच्या यशस्वीतेसाठी अमन कांबळे, स्मिता कांबळे, प्रीतम बुलकुंडे एड. आकाश मून, तक्षशिला वाघधरे, इंजि. प्रदीप नगरारे, इंजि. अरविंद गेडाम, डॉ. अशोक उरकुडे, इंजि. कुलदीप रामटेके, धम्मानन्द मनवर, क्रांति आगलावे, अतुल खोब्रागडे, पुष्पा बौद्ध, मछिन्द्र साळवे, राजकुमार वंजारी, शंकरराव ढंगरे, सुमेध बौद्ध, सरोज आगलावे, उषा बौद्ध, क्षितिज गायकवाड़, विभावरी गजभिये, ज्योति संघर्ष नाईक, विश्वास पाटील, धीरज सहारे, स्वप्निल हुमने, अरुण भारशंकर, श्रुतिका तिरपुडे, नेहाल पाटील, अंकित थूल, अतुल सतदेवे, अजय तांबे, धर्मेश निकोसे, रमेश कटके, अंकुश वाकडे, प्रफुल भालेराव, राजीव झोड़ापे, प्रतीक मेश्राम आदींनी परिश्रम घेतले.

## माहितीच्या अधिकार बोथट करण्याचा प्रयत्न निषेधार्ह'

### नव्या नियमाला पुणे बार असोसिएशनचा आणि ॲड.राम भुजबळ यांचा विरोध

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** महाराष्ट्र माहिती आयोगाच्या नव्या नियमावलीतील नियम २०(३) वर पुणे बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड.राम भुजबळ यांनी तीव्र आक्षेप नोंदवला आहे. या नियमानुसार अपीलकर्ता किंवा तक्रारदाराला सुनावणीदरम्यान मदत करणारी व्यक्ती वकील असू शकत नाही, अशी तरतूद करण्यात आली आहे.

ॲड. भुजबळ यांनी सांगितले की, ही अट केवळ वकिलांच्या व्यावसायिक अधिकारांवर गदा आणणारी नसून सामान्य नागरिकांच्या न्याय्य हक्कालाही बाधा पोहोचवणारी आहे. माहिती आयोगासमोर अनेकदा कायदेशीर आणि गुंतागुंतीचे प्रश्न उपस्थित होत असतात. अशा वेळी नागरिकांना त्यांच्या पसंतीच्या वकिलामार्फत बाजू मांडण्याचा अधिकार नाकारणे हे न्यायाच्या मूलभूत तत्त्वांच्या विरोधात असल्याचे त्यांनी म्हटले.

या विषयावर ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांच्याशी चर्चा करणार असल्याचेही त्यांनी सांगितले. सरकारने या नियमामागील भूमिका स्पष्ट करावी आणि नागरिकांचे कायदेशीर प्रतिनिधित्व करण्याचा वकिलांचा अधिकार अबाधित ठेवावा, अशी मागणी त्यांनी केली.

माहितीचा अधिकार हा लोकशाहीचा कणा असून त्याच्या प्रभावी अंमलबजावणीवर कोणतीही मर्यादा आणणे लोकशाहीसाठी घातक ठरू शकते, असे मत ॲड.भुजबळ यांनी व्यक्त केले.

तसेच नियम २०(३) तात्काळ मागे घेण्याची किंवा त्यात आवश्यक सुधारणा करण्याची मागणीही त्यांनी केली.

## मनपा शाळांच्या खाजगीकरणाविरोधात 'आप'चे अनोखे आंदोलन; मंत्री चंद्रकांत पाटील यांना देणार पंजाबचे विमान तिकीट

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** पुणे महानगरपालिकेच्या शाळांच्या खाजगीकरणाच्या प्रस्तावावरून राजकीय वातावरण तापले असताना आम आदमी पार्टीने (आप) या निर्णयाविरोधात अनोख्या पद्धतीने आंदोलन करण्याचा निर्णय घेतला आहे. पक्षाच्या वतीने राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री तथा कोथरूडचे आमदार चंद्रकांत पाटील यांना पंजाबचे विमान तिकीट भेट देण्यात येणार असून, तेथील सरकारी शाळांमधील बदलांचा प्रत्यक्ष अभ्यास करण्याचे आवाहन करण्यात येणार आहे. पक्षाच्या पदाधिकाऱ्यांकडून सोमवारी चंद्रकांत पाटील यांच्या कोथरूड येथील कार्यालयात जाऊन हे तिकीट सुपूर्द केले जाणार असल्याची माहिती 'आप'च्या नेत्यांनी दिली. पंजाब आणि दिल्लीमधील सरकारी शाळांमध्ये झालेल्या सुधारणांचा अनुभव घेऊन महाराष्ट्रातही अशाच उपाययोजना राबविण्यात याव्यात, हा या आंदोलनामागील उद्देश असल्याचे पक्षाने स्पष्ट केले.



मनपा शाळांच्या खाजगीकरणाच्या मुद्द्यावर नुकत्याच झालेल्या सर्वसाधारण सभेत 'आप'ने तीव्र विरोध दर्शविला होता. त्यानंतर माध्यमांशी बोलताना चंद्रकांत पाटील यांनी सरकारी शाळांच्या गुणवत्तेबाबत केलेल्या वक्तव्यावरून वाद निर्माण झाला. भविष्यात नामांकित शैक्षणिक संस्थांनी मनपा शाळा चालविण्याची तयारी दर्शविल्यास त्यांना संधी दिली जाऊ शकते, असे त्यांनी म्हटले होते. तसेच पालकांचा कल खाजगी शाळांकडे असल्याचेही त्यांनी नमूद केले होते.

या भूमिकेवर टीका करताना 'आप'च्या पदाधिकाऱ्यांनी शिक्षण क्षेत्रातील सुधारणा करण्याची जबाबदारी सरकारची असल्याचे सांगितले. सरकारी शाळांचा दर्जा उंचावण्यात अपयश आल्यामुळे अनेक पालकांना आर्थिक ताण सहन करत खाजगी शिक्षणाचा पर्याय स्वीकारावा लागत असल्याचा आरोप पक्षाने केला.

'आप'चे प्रदेश सचिव डॉ. अभिजीत मोरे यांनी सांगितले की, शिक्षण क्षेत्रातील समस्या सोडविण्याऐवजी सरकारी शाळा खाजगी संस्थांकडे सोपविण्याचा विचार हा योग्य मार्ग नाही. सरकारी शाळांमध्ये दर्जेदार शिक्षण उपलब्ध करून देणे ही शासनाची प्राथमिक जबाबदारी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

पंजाबमधील शिक्षण व्यवस्थेचा उल्लेख करताना पक्षाने दावा केला की, तेथे गेल्या काही वर्षांत सरकारी शाळांमध्ये मोठ्या प्रमाणावर सुधारणा करण्यात आल्या आहेत. त्याचप्रमाणे दिल्लीतही अनेक विद्यार्थ्यांनी खाजगी शाळांमधून सरकारी शाळांकडे वळल्याचे पक्षाचे म्हणणे आहे. या पार्श्वभूमीवर चंद्रकांत पाटील यांनी पंजाब आणि दिल्लीतील शैक्षणिक मॉडेलचा प्रत्यक्ष अभ्यास करावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

# संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यास बैलजोड निवड समिती देणार सेवा

## समिती अध्यक्ष बबनराव कुऱ्हाडे पाटील, नंदकुमार कुऱ्हाडे पाटील यांची घोषणा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**आळंदी :** येथील श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यास यावर्षी बैलजोड निवड समिती बैलजोड सेवा देणार असल्याची माहिती समिती अध्यक्ष बबनराव कुऱ्हाडे पाटील, माजी उपनगराध्यक्ष तथा समिती सदस्य नंदकुमार कुऱ्हाडे पाटील यांनी दिली. .

श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी रथाला बैलजोडी सेवा देण्यासाठी आळंदीकर ग्रामस्थ बैलजोडी निवड समितीने या वर्षी जबाबदारी स्वीकारली आहे . सन १९८२ पासून बैल जोड समिती श्रींचे पालखी रथाला बैलजोडी देण्यासाठी ग्रामस्थांमधून नावे मागवून सेवा पुरवली जाते. या वर्षी रानवडे कुटुंबाकडे सेवा देण्याची जबाबदारी होती. मात्र, याबाबत एकमत न झाल्याने पेच निर्माण झाला. या सेवेसाठी आपला विचार प्राधान्याने करावा अशी आग्रही मागणी करतानाच त्यासाठी उमेश रानवडे त्यांनी लाक्षणिक उपोषण देखील केले.

या वेळी सन्माननीय तोडगा काढायची ग्वाही समितीने दिली होती. मात्र उमेश रानवडे यांना तोडगा मान्य न झाल्याने तसेच आपला हट्ट कायम ठेवून न्यायालयात जाणार असल्याचे सांगितले. अखेर समितीने या प्रकरणी आळंदी पोलिसांत तक्रार देत स्वतः बैलजोडी देण्याचा निर्णय घेऊन देवस्थानला पत्र देऊन कळविले असल्याचे कुऱ्हाडे पाटील यांनी सांगितले. या वर्षी समितीकडे आलेल्या अर्जातून हर्षवर्धन रानवडे, तुळशीराम रानवडे यांच्या नावाची घोषणा बैलजोड सेवा देण्यासाठी समितीने केली होती. यावर उमेश रानवडे यांनी हरकत घेत आपली बैलजोडी लावण्याचा हट्ट धरला.




समितीने अर्जदार यांचे अर्जाप्रमाणे स्थळ पाहणी केली असता बैल जोडीचा गोठा व बैलजोड उमेश रानवडे यांचेकडे नसल्याचे उघड झाले. या मुळे समितीने या प्रकरणी सखोल चौकशी करण्याची मागणी पोलिसांकडे तक्रार देत केली आहे. रानवडे परिवारात अंतर्गत वाद असल्याने समितीने आपल्या अधिकारात निर्णय जाहीर केला. या वर्षी नाहक वाद निर्माण करून समितीचे कामकाजात हस्तक्षेप करण्यात आला. मात्र समिती चे वेगळे अस्तित्व आहे. या वर्षी तीन सदस्य समिती जाहीर केली. त्या ही समितीने अहवाल सादर केला. मात्र, पूर्ण सहमती न मिळाल्याने अखेर स्वतः बैलजोड निवड समिती या वर्षी हबैलजोड सेवा देणार असल्याचे समितीने जाहीर करीत निर्णय घेतला. या प्रकरणी पोलिस प्रशासनावर देखील ताण निर्माण करण्याचा प्रयत्न झाल्याचा आरोप समितीने केला. स्थानिक राजकीय हेतूने प्रेरित व्यक्ती, संस्था, पदाधिकारी यांनी वाद निर्माण केला असल्याचे आरोप ही समितीने केले आहे. या प्रकरणी दोषींवर कारवाई करण्याची मागणी दिलेल्या तक्रारीत करण्यात आली आहे.

# संपादकीय

## डॉक्टर औषधे विकू शकतात का?

भारतात वैद्यकीय व्यवसाय करताना डॉक्टरांसमोर नेहमीच एक प्रश्न उभा राहतो – आम्ही आमच्या दवाखान्यात रुग्णांना औषधे देऊ शकतो का? अनेक डॉक्टरांच्या मनात भीती असते की क्लिनिकमध्ये औषधांचा साठा ठेवला तर ड्रग इन्स्पेक्टर कारवाई करतील. काही ठिकाणी झालेल्या कारवायांमुळे हा संभ्रम अधिकच वाढला. मात्र सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या एका ऐतिहासिक निकालाने या विषयावर स्पष्टता आणली आहे आणि डॉक्टरांचा गैरसमज दूर केला आहे.

**प्रकरण काय होते?**

चेन्नईच्या त्वचारोगतज्ज्ञ डॉ. एस. अथिलक्ष्मी यांच्या क्लिनिकची ड्रग इन्स्पेक्टरनी तपासणी केली. तिथे विविध मलमे, लोशन्स, गोळ्या यांचा साठा आणि रुग्णांना दिलेल्या औषधांच्या पावत्या आढळल्या. यावरून डॉक्टर विनापरवाना औषध विक्रीचा व्यवसाय करत आहेत असा ठपका ठेवून ड्रग्स अँड कॉस्मेटिक्स ॲक्ट, १९४० अंतर्गत फौजदारी खटला दाखल केला गेला.

डॉ. अथिलक्ष्मी यांनी न्यायालयात बाजू मांडली की, मी नोंदणीकृत वैद्यकीय व्यवसायिक आहे. क्लिनिकमधील औषधे फक्त माझ्या स्वतःच्या रुग्णांच्या उपचारासाठी ठेवली होती. मी मेडिकल स्टोअर चालवत नाही आणि रस्त्यावरच्या कोणत्याही व्यक्तीला काउंटरवर औषधे विकत नाही. उपचाराचा भाग म्हणून औषध देणे आणि व्यावसायिक विक्री करणे, यात जमीन-अस्मानाचा फरक आहे.

**शेड्युल के – डॉक्टरांचे कायदेशीर कवच**

या प्रकरणात **Drugs and Cosmetics Rules** मधील शेड्युल के ही तरतूद निर्णायक ठरली. शेडूल के नुसार, नोंदणीकृत डॉक्टरांना स्वतःच्या रुग्णांच्या उपचारासाठी आवश्यक तेवढी औषधे ठेवण्याची व देण्याची मुभा आहे. यामागचा उद्देश रुग्णहिताचा आहे – ताप आलेल्या लहान मुलाला किंवा वेदनेने कळवळणाऱ्या रुग्णाला रात्रीच्या वेळी मेडिकल शोधत फिरावे लागू नये.

**सर्वोच्च न्यायालयाने काय सांगितले?**

१. क्लिनिकमध्ये औषधसाठा म्हणजे मेडिकल स्टोअर नव्हे: फक्त औषधे आढळली म्हणून डॉक्टर व्यावसायिक विक्रेता ठरत नाही.

२. उपचारासाठी औषध देणे हा वैद्यकीय व्यवसायाचाच भाग आहे: डॉक्टरने लिहिलेल्या प्रिस्क्रिप्शनप्रमाणे त्याच रुग्णाला औषध दिले तर तो गुन्हा नाही.

३. शेड्युल 'के'च्या संरक्षणाचा विचार व्हायलाच हवा: खालच्या न्यायालयाने व ड्रग विभागाने कायद्यातील ही सूट दुर्लक्षित केली होती, हे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले.

४. फौजदारी कारवाई रद्द: न्यायालयाने डॉ. अथिलक्ष्मी यांच्यावरील संपूर्ण खटला रद्द केला आणि नमूद केले की, उपचारासाठी औषध पुरवणे ही औषध विक्री नाही. याचा अर्थ डॉक्टरांना अमर्याद अधिकार मिळाले का? नाही. या निर्णयाचा गैरअर्थ काढू नये. सर्वोच्च न्यायालयाने लक्ष्मणरेषा आखून दिली आहे:

**डॉक्टर करू शकतात, डॉक्टर करू शकत नाहीत**

स्वतः तपासलेल्या रुग्णाला उपचारासाठी आवश्यक औषध देणे खुले मेडिकल स्टोअर थाटून सर्वसामान्यांना औषधेविकणे आपत्कालीन परिस्थितीत तातडीने औषध उपलब्ध करणे औषधांचा मोठ्या प्रमाणावर साठा करून व्यापारी नफा कमावणे शेड्युल के मधील अटी पाळून मर्यादित साठा ठेवणे ड्रग लायसन्सशिवाय शेड्युल **M, M 1,** एक्स ची औषधे विकणे औषधांच्या खरेदी-वितरणाच्या नोंदी ठेवणे डॉक्टर नसलेल्या व्यक्तीमार्फत क्लिनिकमध्ये औषध विक्री करणे

**ग्रामीण भारतासाठी विशेष महत्त्व**

शहरात गल्लीबोळात मेडिकल्स आहेत, पण खेड्यात रात्री-अपरात्री एकच डॉक्टर आधार असतो. सर्पदंश, ताप, अपघात अशा वेळी डॉक्टरकडे औषध नसेल तर रुग्ण दगावू शकतो. सर्वोच्च न्यायालयाचा हा निर्णय रुग्ण प्रथम या तत्त्वाला कायदेशीर बळ देणारा आहे.

**डॉक्टरांसाठी ५ कायदेशीर टिप्स**

१. फक्त स्वतःच्या रुग्णांना द्या: तुम्ही तपासले नाही, निदान केले नाही, अशा व्यक्तीला औषध देऊ नका.

२. नोंदी ठेवा: कोणत्या रुग्णाला, कोणते औषध, किती प्रमाणात, कोणत्या तारखेला दिले – याची वही किंवा सॉफ्टवेअरमध्ये नोंद ठेवा. बिल द्या.

३. मर्यादित साठा: तुमच्या रोजच्या प्रॅक्टिसपुरता साठा ठेवा. गोदाम करू नका.

४. बोर्ड लावू नका: येथे सर्व प्रकारची औषधे मिळतील असा बोर्ड क्लिनिकबाहेर लावणे म्हणजे मेडिकल स्टोअरचा संशय.

**५. नियमित अपडेट राहा: Schedule H, H1, X, NDPS** ची औषधे याबाबत राज्याच्या **FDA** चे नियम वेळोवेळी तपासा.

# धायरीतील केमिकल गोदाम फोडणारी टोळी अटकेत; २० लाखांहून अधिक किंमतीचा मुद्देमाल जप्त

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे** : धायरी परिसरातील एका केमिकल कंपनीच्या गोदामातून लाखो रुपयांचे ॲसिड चोरी करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश करण्यात नांदेड सिटी पोलिसांना यश आले आहे. या प्रकरणी तीन जणांना अटक करण्यात आली असून त्यांच्याकडून चोरीचा माल आणि गुन्ह्यात वापरण्यात आलेले वाहन असा एकूण २० लाख ४० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. धायरी येथील कॅनॉलजवळ असलेल्या रिलायबल केमिकल्स कंपनीच्या गोदामातून 'ऑर्थो फॉस्फोरिक ॲसिड'चे कॅन चोरीला गेल्याची घटना काही दिवसांपूर्वी उघडकीस आली होती. चोरीस गेलेल्या मालाची किंमत सुमारे १५ लाख ४० हजार रुपये असल्याचे समोर आले होते. याप्रकरणी नांदेड सिटी पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०५ (अ) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता.




गुन्ह्याचा तपास सुरू असताना पोलिसांनी घटनास्थळ परिसरातील माहिती संकलित केली तसेच गोपनीय माहितीदारांचे जाळे सक्रिय केले. तपासादरम्यान मिळालेल्या गुप्त माहितीनुसार धायरीतील धायरीश्वर मंदिर परिसरात संशयिताची हालचाल असल्याचे समोर आले. त्यानुसार पोलिसांनी सापळा रचून वैभव बाळासाहेब चव्हाण (वय २६) याला ताब्यात घेतले.

चौकशीदरम्यान चव्हाण याने दोन साथीदारांच्या मदतीने गोदामातून ॲसिडचे कॅन चोरल्याची कबुली दिली. त्यानंतर पोलिसांनी रोहन संतोष इंदुलकर (वय २९) आणि निखील तानाजी पवार (वय २३) यांना अटक केली. तिन्ही आरोपी धायरी परिसरातील रहिवासी असल्याची माहिती पोलिसांनी दिली. आरोपींकडून चोरीला गेलेले १५४ ऑर्थो फॉस्फोरिक ॲसिडचे कॅन हस्तगत करण्यात आले आहेत. याशिवाय चोरीसाठी वापरण्यात आलेली पिकअप गाडीही जप्त करण्यात आली. जप्त करण्यात आलेल्या मालाची आणि वाहनाची एकत्रित किंमत २० लाख ४० हजार रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले. या कारवाईमुळे औद्योगिक वापरासाठी असलेल्या महागड्या रासायनिक पदार्थांच्या चोरीचा गुन्हा उघडकीस आला असून पुढील तपास सुरू आहे. नांदेड सिटी पोलीस ठाण्याच्या पथकाने केलेल्या या कारवाईचे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी कौतुक केले आहे. अपर पोलीस आयुक्त राजेश बनसोडे, पोलीस उपआयुक्त सागर कवडे आणि सहाय्यक पोलीस आयुक्त विजय कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक अतुल भोस, पोलीस निरीक्षक (गुन्हे) प्रसाद राऊत, उपनिरीक्षक दत्तात्रय सावंत तसेच तपास पथकातील अधिकाऱ्यांनी ही कारवाई यशस्वीरीत्या पार पाडली.

# नागपूरच्या विद्यार्थ्याने स्वतः अबू धाबीचे परीक्षा केंद्र सिलेक्ट केले होते? NTA ने रेकॉर्ड समोर आणत केला खुलासा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नागपूर** : राष्ट्रीय चाचणी संस्थेने नागपूरच्या एका **NEET UG 2026** उमेदवाराला अबू धाबीमधील परीक्षा केंद्र दिल्याचे समोर आले होते. याबाबत आता एनटीएने स्पष्टीकरण दिले. उमेदवाराच्या नोंदणीकृत लॉगिनद्वारे परीक्षेचे शहर बदलण्यात आले होते. त्यानंतर उमेदवाराकडून परीक्षा केंद्र बदलण्याची विनंती मिळाल्यानंतर **NTA** ने ही कारवाई केली होती, अशी माहिती दिली. याबाबत वेब रेकॉर्ड एनटीएने दिले.



एनटीएने सांगितले की, नीट २०२६ परीक्षा २१ जून रोजी पुनर्निर्धारित केल्यानंतर, उमेदवारांच्या सोयीसाठी परीक्षा-शहर दुरुस्ती विंडो पुन्हा उघडण्यात आली. एजन्सीच्या मते, अंदाजे ३.२ लाख उमेदवारांनी या सुविधेचा लाभ घेतला आणि त्यापैकी ९९.५ टक्क्यांहून अधिक उमेदवारांना त्यांच्या पसंतीचे परीक्षा शहर देण्यात आले. अबू धाबी केंद्रासंदर्भातील वादाबाबत, एनटीएने सांगितले की त्यांच्या नोंदीनुसार परीक्षा शहरातील बदल उमेदवाराने स्वतःच्या लॉगिनद्वारे केला होता आणि त्याच वापरकर्त्याद्वारे सातत्याने प्रवेश केल्याचे दिसून येते.

**उमेदवाराच्या लॉगिनमधून परीक्षेचे शहर बदलले**

उमेदवाराच्या नोंदणीकृत लॉगिनमध्ये तीन वेगवेगळ्या प्रसंगी अबू धाबी केंद्र त्यांच्या वेबसाइटवर दिसले. उमेदवाराच्या आयडीने परीक्षा केंद्र बदलून अबू धाबी केले, तर इतर दोन वेळी अबू धाबी केंद्राचे प्रिव्ह्यू दिसले. असे असूनही, १९ जूनच्या संध्याकाळी, परीक्षेच्या सुमारे ४८ तास आधी, **NTA** ला परीक्षा केंद्र अबू धाबीवरून नागपूरला बदलण्याची एक अनौपचारिक विनंती प्राप्त झाली. एजन्सीने सांगितले की, ही विनंती प्राप्त झाल्यावर, त्यांच्या अधिकाऱ्यांनी केंद्र बदलण्याची प्रक्रिया सुरू केली आणि आवश्यक औपचारिकता पूर्ण करण्यासाठी त्याच संध्याकाळी उमेदवाराच्या वडिलांशी संपर्क साधला.

**उमेदवाराच्या विनंतीनुसार नागपूरमध्ये एक केंद्र दिले**

राष्ट्रीय चाचणी संस्थेने सांगितले की, उमेदवाराने वैयक्तिकरित्या अबू धाबी हे परीक्षेचे शहर म्हणून निवडले असले तरी, त्यांनी परीक्षेच्या ४८ तास आधी केंद्र बदलण्याची त्याची विनंती स्वीकारली आणि त्याला नागपूरमध्ये एक केंद्र वाटप केले. नागपूरचे रहिवासी असलेल्या अब्दुल्ला तालिब यांना नीट परीक्षेसाठी अबू धाबी येथील केंद्र वाटप करण्यात आल्यावर हा मुद्दा उघडकीस आला.

# गणपतीपुळे समुद्रात छत्रपती संभाजीनगरचे ८ पर्यटक बुडाले

## तीन वाचले, पाच बेपत्ता



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**गणपतीपुळे** : गणपतीपुळे समुद्रात छत्रपती संभाजीनगरचे ८ पर्यटक बुडाले; तीन वाचले, पाच बेपत्ता रत्नागिरी प्रतिनिधी रत्नागिरीतील प्रसिद्ध पर्यटन स्थळ गणपतीपुळे येथे एक धक्कादायक आणि दुर्दैवी घटना घडली आहे. शनिवारी सकाळी १० वाजण्याच्या सुमारास छत्रपती संभाजीनगर येथील ८ पर्यटक समुद्रात उतरले होते. मात्र, भरती आणि पाण्याचा योग्य अंदाज न आल्यामुळे सर्वजण लाटांसोबत वाहून जाऊ लागले. स्थानिक नागरिक आणि जीवरक्षकांनी तातडीने जीवाची बाजी लावून ३ जणांचे प्राण सुखरूप वाचवले आहेत. मात्र, दुर्दैवाने उर्वरित ५ जण अद्यापही बेपत्ता आहेत. पोलीस, प्रशासन, जीवरक्षक आणि स्थानिक मच्छीमारांच्या मदतीने समुद्रात युद्धपातळीवर शोधमोहीम सुरू आहे. पर्यटकांना आवाहन आहे की, समुद्रात उतरताना काळजी घ्या आणि प्रशासनाने दिलेल्या सूचनांचे पालन करा.

# 'एमआयटी एडीटी' विद्यापीठात आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे** : 'निरोगी वृद्धत्वासाठी योग' या संकल्पनेवर आधारित येथील एमआयटी आर्ट, डिझाईन अँड टेक्नॉलॉजी (एडीटी) विद्यापीठात सामूहिक योगासनांच्या प्रात्यक्षिकांद्वारे १२ वा आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला. समग्र विश्वाला शांततेचा संदेश देणाऱ्या संत ज्ञानेश्वर महाराज विश्वशांती घुमटाच्या साक्षीने झालेल्या या योगोत्सवात विद्यार्थी, पालक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. यावेळी उपस्थितांनी निरोगी जीवनासाठी दररोज योगाभ्यास करण्याचा संकल्प केला.

हा आंतरराष्ट्रीय योग दिन जगातील सर्वात उंच 'विश्वशांती घुमट' या ठिकाणी दरवर्षीप्रमाणे साजरा करण्यात आला. विज्ञान आणि अध्यात्माचा अनोखा संगम साधणाऱ्या या भव्य घुमटाची संकल्पना व निर्मिती माईर्स शिक्षण समुहाचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड यांनी केली आहे.

भारत सरकारच्या आयुष मंत्रालय, आंतरराष्ट्रीय नॅचरोपॅथी संघटना, मोरारजी देसाई राष्ट्रीय योग संस्थान, आर्ट ऑफ लिव्हिंग, सूर्या फाउंडेशन आणि एमआयटी एडीटी विद्यापीठाच्या स्कूल ऑफ होलिस्टिक डेव्हलपमेंट यांच्या संयुक्त विद्यमाने, कार्याध्यक्ष प्रा. डॉ. मंगेश कराड यांच्या मार्गदर्शनाखाली




या भव्य योगोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विद्यापीठाच्या कार्यकारी संचालक प्रा. डॉ. सुनीता कराड, कुलगुरू प्रा. डॉ. राजेश एस., प्र-कुलगुरू डॉ. मोहित दुबे, परीक्षा नियंत्रक डॉ. ज्ञानदेव निलवर्ण, स्कूल ऑफ होलिस्टिक डेव्हलपमेंटचे संचालक व कार्यक्रमाचे मुख्य समन्वयक डॉ. अतुल पाटील, क्रीडा विभागाचे संचालक प्रा. पद्माकर फड, कॅम्पस संचालक दिलीप पाटील आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला डॉ. अतुल पाटील यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत केले. त्यानंतर विद्यापीठाच्या नियमित आरोग्य सराव सत्रांच्या व्हिडिओ अहवालाचे सादरीकरण आणि विशेष 'योग पुस्तिकेचे' प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

अध्यक्षीय भाषणात प्रा. डॉ. सुनीता कराड म्हणाल्या, योग ही केवळ शारीरिक कसरत नसून ती जीवन जगण्याची कला आहे. आपल्या धावपळीच्या युगात मानसिक संतुलन आणि शारीरिक सुदृढता राखण्यासाठी योग हाच एकमेव मार्ग आहे.

कुलगुरू प्रा. डॉ. राजेश एस. म्हणाले, 'निरोगी वृद्धत्वासाठी योग' हा संदेश आजच्या तरुण पिढीने आत्मसात करणे गरजेचे आहे, जेणेकरून ते भविष्यात सक्षम नागरिक बनू शकतील.

मुख्य सत्रात स्कूल ऑफ होलिस्टिक डेव्हलपमेंटच्या योग तज्ज्ञांनी उपस्थितांकडून 'कॉमन योग प्रोटोकॉल'नुसार (उधझ) योगासने आणि ध्यान सत्र करवून घेतले. राष्ट्रगीताने या यशस्वी सोहळ्याची सांगता झाली.

# 'कौशिक आश्रम' ज्येष्ठ कार्यकर्त्यांप्रती कृतज्ञतेची अभिव्यक्ती; भय्याजी जोशी यांचे प्रतिपादन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे** : घरातील ज्येष्ठ व्यक्तींची काळजी घेणे ही सेवा नसून कर्तव्याची पूर्तता असल्याची भावना व्यक्त करत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या केंद्रीय कार्यकारिणीचे सदस्य भय्याजी जोशी यांनी 'कौशिक आश्रम' हे संघाच्या ज्येष्ठ प्रचारकांप्रती कृतज्ञता व्यक्त करणारे आणि कर्तव्यपूर्तीचे केंद्र असल्याचे सांगितले. मित्रमंडळ सोसायटी परिसरातील 'कौशिक आश्रम'च्या पुनर्निर्माणानिमित्त आयोजित कृतज्ञता सत्कार समारंभात ते बोलत होते. यावेळी संघाच्या पश्चिम महाराष्ट्र प्रांताचे संघचालक प्रा. नानासाहेब जाधव, संस्थेचे विश्वस्त दिवाकर पांडे तसेच विविध मान्यवर उपस्थित होते.



पुनर्निर्माणाच्या कार्यात योगदान देणाऱ्या हितचिंतकांचा प्रातिनिधिक सत्कार या कार्यक्रमात करण्यात आला. या प्रसंगी बोलताना भय्याजी जोशी यांनी ज्येष्ठ कार्यकर्त्यांसाठी आत्मीयता, सन्मान आणि समाधानाचे वातावरण निर्माण करण्याची गरज अधोरेखित केली.

'कौशिक आश्रम' हे केवळ निवासस्थान किंवा सेवाकेंद्र नसून आयुष्यभर समाजकार्य करणाऱ्या ज्येष्ठ कार्यकर्त्यांना आत्मीयतेचा अनुभव देणारे ठिकाण आहे, असे ते म्हणाले. आयुष्याच्या उत्तरार्धात समाधान, आपुलकी आणि आनंद यांचा अनुभव मिळावा, या उद्देशाने या वास्तूची उभारणी करण्यात आली असल्याचे त्यांनी नमूद केले.

या ठिकाणी संस्थात्मक किंवा कार्यालयीन वातावरण निर्माण होणार नाही, तर घरातील जिव्हाळा आणि स्नेह अनुभवता येईल, याची काळजी घेतली जाईल, असे आश्वासनही त्यांनी दिले. पुढील काळातही येथे सकारात्मक आणि समाधानकारक वातावरण कायम राहील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमात डॉ. जगदीश करमळकर यांनीही मनोगत व्यक्त केले. त्यांनी आश्रमाच्या कार्याचा आढावा घेत ज्येष्ठ कार्यकर्त्यांच्या निवास आणि देखभालीसाठी होत असलेल्या प्रयत्नांची माहिती दिली.

दरम्यान, कार्यक्रमापूर्वी मित्रमंडळ सोसायटीच्या पदाधिकाऱ्यांसोबत झालेल्या संवादात 'कौशिक आश्रम' आपल्या परिसरात असल्याचा आनंद त्यांनी व्यक्त केला. त्यावर प्रतिक्रिया देताना भय्याजी जोशी म्हणाले की, 'कौशिक आश्रम' हे मैत्री, स्नेह आणि सामाजिक बांधिलकीचा संदेश देणारे केंद्र असून भविष्यातही ते समाजात हाच संदेश पोहोचवत राहील.

ज्येष्ठ कार्यकर्त्यांप्रती आदर, कृतज्ञता आणि आत्मीयता जपण्याचा प्रयत्न म्हणून 'कौशिक आश्रम'चे कार्य महत्त्वाचे ठरत असल्याचे मत यावेळी उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले.

# भोंदू मिश्रासह महिला आरोपींचा 'असहकार'; तपासात सहकार्य करीत नसल्याची तपास अधिकाऱ्याची न्यायालयात माहिती

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे** : बलात्कार, छळ व इतर गंभीर आरोपांखाली दाखल गुन्ह्यात आरोपींकडून जप्त करण्यात आलेल्या लॅपटॉपमधील पुरावे मिळवायचे आहेत, मात्र लॅपटॉपच्या पासवर्डची मागणी केली असता आरोपींनी कोणत्याही प्रकारचा पासवर्ड दिला नाही. आरोपी हे जाणूनबुजून तपासामध्ये सहकार्य करीत नसल्याची माहिती तपासी अधिकारी यांनी न्यायालयात दिली. या गुन्ह्याचे धागेदोरे हे हरियाणा राज्यापर्यंत असल्याचेही पोलिसांनी सांगितले. दरम्यान, आरोपींना न्यायालयाने दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.



खराडी पोलिस ठाण्यात दाखल गुन्ह्यानुसार, राधामोहन मिश्रा, त्याचा सहकारी स्वामी कंवल नयन आणि सहा महिला आरोपींविरोधात गंभीर आरोपांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या आरोपीच्या पोलीस कोठडीची मुदत संपत आल्याने सर्व आरोपींना शनिवारी (दि.२०) प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी व्ही. व्ही गिरम यांच्या न्यायालयात हजर करण्यात आले होते.

राधामोहन मिश्रा याने फिर्यादीला अश्लील फोटो व व्हिडीओ दाखवून बालाकार केला असून, त्याच्याकडे या अनुषंगाने तपास केला असता त्याने सहकार्य केलेले नाही. गुन्हयात जप्त करण्यात आलेली जिवंत काडतुसे ही कोणत्या हत्याराची आहेत तसेच हत्यार कोठे लपवून ठेवले आहे, ही काडतुसे कोणी पुरविली व त्याचा उपयोग कशासाठी याबाबत आरोपीकडे तपास केला पण उडवाउडवीची उत्तरे दिली. त्यामुळे आरोपींना चार दिवसांची पोलीस कोठडी मिळावी अशी मागणी सरकारी वकील कल्पना झोरे यांनी केली. त्यानुसार न्यायालयाने आरोपींना दि. २२ जून पर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे. आरोपीच्या वतीने ॲड राहुल देशमुख, अँड गणेश गुप्ता आणि ॲड रोहन नहार यांनी काम पाहिले.

**उद्या सुनावणी होणार**

आरोपी महिलांना बेकायदेशीरपणे अटक केल्यामुळे त्यांना जामीन मिळण्याचे स्वातंत्र्य आहे. या निकषावर महिला आरोपींनी शुक्रवारी ( दि.१९) ॲड गणेश गुप्ता यांच्यामार्फत उच्च न्यायालयात रिट पिटिशन दाखल केले आहे. या पिटीशन संबंधी तपास यंत्रणेने प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे आदेश दिले आहेत. या प्रकरणाची सुनावणी सोमवारी (दि.२२) होणार आहे.

**मिश्राला गंभीर आजार**

राधामोहन मिश्रा याला गंभीर आजार असून, या आजारात एकेक अवयव निकामी होतात. यावर त्याची सहा महिन्यांपासून औषधे सुरु आहेत. या आजारासाठी त्याला इंजेक्शन घ्यावे लागते. त्यामुळे त्याला उपचारासाठी खासगी रुग्णालयात दाखल करण्याची मागणी बचाव पक्षाने केली.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स ॲण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### वाल्हेकरवाडीतील जिजामाता चौकात कारच्या कटवरून एकमेकांना मारहाण

**पिंपरी :** वाल्हेकर-वाडीतील जिजामाता चौकात कारला कट मारल्याच्या कारणावरून दोन गटांमध्ये झालेल्या वादाचे रूपांतर हाणामारीत झाले. या प्रकरणी दोन्ही बाजूंनी परस्परविरोधी फिर्यादी दाखल केल्याने चिंचवड पोलिसांनी दोन्ही गटांविरुद्ध स्वतंत्र गुन्हे नोंदवले आहेत.

पहिल्या फिर्यादीनुसार, रस्त्यात कार थांबवण्याबाबत विचारणा केल्याच्या रागातून काही तरुणांनी एका व्यक्तीस शिवीगाळ करून मारहाण केली तसेच त्याला मदतीला आलेल्या पोलीस भरती प्रशिक्षण केंद्रातील युवकांनाही मारहाण केल्याचा आरोप आहे. तर दुसऱ्या फिर्यादीत, कारला कट मारल्याबाबत जाब विचारल्याने वाद झाल्याचे नमूद करण्यात आले आहे. त्यानंतर संबंधित व्यक्तीने पोलीस भरती प्रशिक्षण घेणाऱ्या युवकांना बोलावून मारहाण व धमकावल्याचा आरोप करण्यात आला आहे. या घटनेमुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. चिंचवड पोलीस दोन्ही फिर्यादींच्या आधारे तपास करत असून नेमकी घटना काय घडली याचा शोध घेत आहेत.

### रावेतच्या मस्के वस्तीत स्पा सेंटरचा व्हिडीओ व्हायरल करण्याची धमकी

**पिंपरी :** रावेत येथील मस्के वस्ती येथील एका स्पा सेंटरमध्ये परवानगीशिवाय प्रवेश करून व्हिडीओ चित्रीकरण करत स्पा चालकाकडे खंडणी मागितल्याचा प्रकार उघडकीस आला आहे.

याप्रकरणी रावेत पोलिसांनी एका महिलेसह विष्णू सुरवसे आणि इतर दोन अनोळखी व्यक्तींविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपींनी स्पा सेंटरचे व्हिडीओ काढून ते सोशल मीडियावर व्हायरल करण्याची धमकी देत चालकाकडे ५० हजार रुपयांची मागणी केली. त्यापैकी ५ हजार रुपये रोख स्वरूपात घेतल्याचा आरोप आहे.

### भोसरीत बनावट कागदपत्रांच्या आधारे ४० लाखांचे कर्ज; पतसंस्थेची फसवणूक

**पिंपरी :** भोसरीतील यशोमंदीर सहकारी पतपेढीची तब्बल ४० लाख रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी आठ जणांविरुद्ध भोसरी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपींनी आधीच इतर बँका व पतसंस्थांकडे गहाण असलेली मालमत्ता लपवून पतसंस्थेकडून ४० लाख रुपयांचे कर्ज घेतले. त्यासाठी चुकीचे सर्च अँड टायटल अहवाल, अपूर्ण कागदपत्रे तसेच कथित बनावट दस्तऐवजांचा वापर करण्यात आल्याचा आरोप आहे. कर्जाची परतफेड न करता पतसंस्थेची आर्थिक फसवणूक केल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. भोसरी पोलिसांकडून प्रकरणाचा तपास सुरू आहे.


# दाभाडे सरकार चौकातील चार दिवसांचा अंधार संपला!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**चऱ्होली :** चऱ्होली येथे दाभाडे सरकार चौक परिसरातील अलंकार सोसायटीमध्ये एलटी (LT) केबल खराब झाल्यामुळे गेल्या चार दिवसांपासून नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. वीजपुरवठा विस्कळीत झाल्याने सोसायटीची पाणीपुरवठा व्यवस्था ठप्प झाली होती. तसेच लिफ्ट बंद असल्यामुळे ज्येष्ठ नागरिक, महिला आणि लहान मुलांना दररोज त्रास सहन करावा लागत होता.

या गंभीर समस्येची माहिती मिळताच, भारतीय जनता पार्टीचे नेते तथा आमदार महेश लांडगे यांनी तातडीने महावितरणच्या संबंधित विभागाशी संपर्क साधून प्रश्न मार्गी लावण्यासाठी पाठपुरावा केला. त्यांच्या सूचनेनुसार आणि प्रशासनाच्या समन्वयातून तब्बल १५० मीटर नवीन एलटी केबल टाकण्याचे काम युद्धपातळीवर पूर्ण करण्यात आले.

केबल बदलण्याचे काम पूर्ण झाल्यानंतर सोसायटीचा वीजपुरवठा सुरळीत झाला असून पाणीपुरवठा पूर्ववत सुरू झाला आहे. तसेच लिफ्टही कार्यान्वित झाल्याने विशेषतः ज्येष्ठ नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. चार दिवसांच्या या गैरसोयीमुळे नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र आमदार महेश लांडगे यांनी स्वतः लक्ष घालून प्रशासनाला आवश्यक सूचना दिल्यामुळे समस्या तातडीने सोडविण्यात यश आले. त्यामुळे अलंकार सोसायटीतील रहिवाशांनी समाधान व्यक्त करत आमदार लांडगे यांचे आभार मानले आहेत.



स्थानिक नागरिकांच्या मूलभूत सुविधांबाबत कोणतीही तडजोड न करता तत्परतेने काम करण्याची भूमिका आमदार महेश लांडगे यांनी पुन्हा एकदा दाखवून दिली आहे. त्यांच्या सक्रिय हस्तक्षेपामुळे चार दिवसांपासून अंधार आणि गैरसोयीचा सामना करणाऱ्या अलंकार सोसायटीतील शेकडो रहिवाशांना अखेर मोठा दिलासा मिळाला आहे.

> नागरिकांच्या मूलभूत सुविधांशी संबंधित प्रश्नांना प्राधान्य देणे ही लोकप्रतिनिधी म्हणून माझी जबाबदारी आहे. अलंकार सोसायटीतील वीजपुरवठा खंडित झाल्यामुळे पाणीपुरवठा आणि लिफ्ट सेवा बंद पडून नागरिकांची मोठी गैरसोय होत होती. ही बाब समोर आल्यानंतर संबंधित यंत्रणांशी तातडीने समन्वय साधून नवीन एलटी केबल टाकण्याचे काम पूर्ण करण्यात आले. त्यामुळे नागरिकांना दिलासा मिळाला आहे. भविष्यात अशा समस्या उद्भवू नयेत यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याच्या सूचना प्रशासनाला दिल्या आहेत. नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी निगडित प्रश्न सोडविण्यासाठी आम्ही कायम कटिबद्ध आहोत.
>
> **– महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.**

# प्रभाग क्रमांक २५ मध्ये 'शासन आपल्या दारी' उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** प्रभाग क्रमांक २५ मधील नगरसेवक कुणाल वाव्हळकर यांच्या पुढाकाराने आयोजित करण्यात आलेल्या 'शासन आपल्या दारी' या जनहिताच्या उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. चिंचवडचे आमदार शंकर जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला.




या उपक्रमाअंतर्गत नागरिकांना उत्पन्नाचा दाखला, रहिवासी दाखला, आयुष्मान भारत कार्ड, रेशन कार्ड, पॅन कार्ड दुरुस्ती तसेच विविध शासकीय कागदपत्रे आणि योजनांचा लाभ मोफत उपलब्ध करून देण्यात आला. शासनाच्या सेवा सर्वसामान्य नागरिकांपर्यंत सुलभपणे पोहोचाव्यात आणि आवश्यक कागदपत्रांसाठी होणारी धावपळ कमी व्हावी, या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

सकाळपासूनच नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून विविध शासकीय सेवांचा लाभ घेतला. शेकडो नागरिकांनी या उपक्रमाचा लाभ घेत समाधान व्यक्त केले.

यावेळी नगरसेवक धर्मपाल तंदरपाळे, युवा नेते चेतन भाऊ भुजबळ, लक्ष्मीदीप सोसायटीचे चेअरमन रामभाऊ गावंडे, सामाजिक कार्यकर्ते धनंजय कोयते, अमोल डोंगरे, योगेश भोसले, किरण समिंदर, अविनाश शिरसाठ, संतोष भेंगळे, रजनीकांत वावळकर, विशाल वावळकर, रोहित पारदे, प्रमोद शिंदे, आप्पा माने यांच्यासह अनेक मान्यवर, कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित होते.

या उपक्रमामुळे नागरिकांना आवश्यक शासकीय कागदपत्रे आणि योजनांचा लाभ एकाच ठिकाणी मिळणे अधिक सुलभ झाले. नगरसेवक कुणाल वाव्हळकर यांच्या या उपक्रमाचे परिसरातील नागरिकांनी स्वागत करत समाधान व्यक्त केले.

# महिलांच्या सुरक्षिततेसाठी नागरी सुरक्षा कृती समितीची गंगानगरमध्ये स्थापना

## महिलांनी सुरक्षिततेबाबत जागरूक राहण्याची गरज : पोलीस निरीक्षक निता गायकवाड

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**निगडी :** प्राधिकरण नागरी सुरक्षा कृती समितीच्या गंगानगर-प्राधिकरण शाखेचे उद्घाटन उत्साहात पार पडले. या कार्यक्रमात मोठ्या संख्येने महिला व महाविद्यालयीन तरुणींनी सहभाग घेतला. प्रमुख पाहुण्या म्हणून निगडी वाहतूक विभागाच्या पोलीस निरीक्षक निता गायकवाड उपस्थित होत्या.



यावेळी बोलताना गायकवाड म्हणाल्या की, सध्याच्या धावत्या शहरी जीवनशैलीत महिला मोठ्या प्रमाणात कामानिमित्त व कौटुंबिक कारणांसाठी घराबाहेर पडत आहेत. त्यामुळे वाहन चालविताना व प्रवास करताना स्वतःच्या सुरक्षिततेची काळजी घेणे अत्यंत आवश्यक आहे. दुचाकीस्वार महिलांनी हेल्मेटचा वापर करावा तसेच वाहतूक नियमांचे पालन करून सुरक्षित प्रवास करावा, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमास माजी उपमहापौर शैलजाताई मोरे, माजी नगरसेविका वृषाली मोरे, अनुप मोरे, विजय मुनोत, शिल्पा हेरलगी, रुपाली भालेराव, गौरी सरोदे, राम सुर्वे, विशाल शेवाळे, संतोष चव्हाण, उद्धव कुंभार, धीरज नारखेडे, प्राधिकरण नागरी सुरक्षा कृती समितीचे राज्याध्यक्ष डॉ. विजयकुमार पाटील तसेच पत्रकार नंदू साळुंखे उपस्थित होते.

यावेळी शैलजा मोरे व निता गायकवाड यांच्या हस्ते तक्रार पेटी आणि प्रथमोपचार पेटीचे उद्घाटन करण्यात आले. शैलजा मोरे यांनी महिलांनी एकत्र येऊन परिसराच्या सुरक्षेसाठी घेतलेला पुढाकार कौतुकास्पद असल्याचे सांगितले.

डॉ. विजयकुमार पाटील यांनी नागरी समस्या सोडविणे आणि पोलीस प्रशासनाला सहकार्य करण्यासाठी महिला व युवतींचा वाढता सहभाग पिंपरी-चिंचवड शहरासाठी अभिमानास्पद असल्याचे नमूद केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सुहास करडे, अनुराधा वाघचौरे, तेजस सकट, उमेश देशमुख यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले. सूत्रसंचालन डॉ. विजयकुमार पाटील यांनी केले तर आभार प्रदर्शन विशाल शेवाळे यांनी केले.

# न्यू सिटी प्राईड इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले संचालित न्यू सिटी प्राईड इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. यानिमित्ताने श्री माताजी निर्मलादेवी सहजयोग ट्रस्टच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी योग व ध्यान सत्राचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमात पूजा चंदा, विक्रम चंदा, नेहा अस्थाना, संतोष मालविया, अमृता वेंगीनावार, प्रीती भामे, पंकज रोडे आणि संजय किसल यांनी विद्यार्थ्यांना योगाचे महत्त्व समजावून सांगितले. तसेच विविध योगासने आणि ध्यानाचे प्रात्यक्षिक करून विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष सहभाग घेण्यास प्रोत्साहित केले. कार्यक्रमास संस्थेचे संस्थापक अरुण चाबुकस्वार, उपमुख्याध्यापक सचिन कळसाईत, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. योगामुळे शारीरिक व मानसिक आरोग्य सुदृढ राहण्यास मदत होते, तसेच एकाग्रता आणि सकारात्मकता वाढते, असा संदेश यावेळी देण्यात आला. विद्यार्थ्यांनी योगासनांमध्ये उत्स्फूर्त सहभाग घेतला. संपूर्ण कार्यक्रम प्रेरणादायी आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन सौ. सोनाली पतंगे यांनी केले.

# 'आएस्का' मोबाईल ॲप ज्येष्ठांसाठी विश्वासार्ह साथीदार ठरेल : पद्मश्री डॉ. गिरीश प्रभुणे

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** ज्येष्ठ नागरिकांच्या सुरक्षितता, आरोग्य आणि सामाजिक सहभागाला चालना देण्यासाठी विकसित करण्यात आलेल्या 'आएस्का' मोबाईल ॲपचे लोकार्पण शनिवारी पुण्यात उत्साहात पार पडले. या प्रसंगी बोलताना पद्मश्री डॉ. गिरीश प्रभुणे यांनी वृद्धत्वाकडे सकारात्मक दृष्टीकोनातून पाहण्याची गरज व्यक्त करत, हे ॲप ज्येष्ठांसाठी आधारवड आणि मदतनीस ठरेल, असा विश्वास व्यक्त केला. घोले रोड येथील पंडित जवाहरलाल नेहरू सभागृहात आयोजित कार्यक्रमात ऑल आयकॉनिक सिनिअर सिटिझन्स असोसिएशन (एआयएससीए) या संस्थेच्या वतीने विकसित करण्यात आलेल्या मोबाईल ॲपचे अधिकृत लोकार्पण करण्यात आले. समाजातील ज्येष्ठ नागरिकांना आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून विविध सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने हे ॲप तयार करण्यात आले आहे.




यावेळी डॉ. प्रभुणे म्हणाले की, वृद्धत्व हा आयुष्याचा नैसर्गिक टप्पा असून तो अनुभव, शहाणपण आणि जीवनमूल्यांची शिदोरी घेऊन येतो. मात्र बदलत्या सामाजिक रचनेमुळे अनेक ज्येष्ठ नागरिकांना एकाकीपणाचा सामना करावा लागतो. अशा परिस्थितीत तातडीची मदत, संवाद आणि सुरक्षिततेची भावना निर्माण करणारे साधन म्हणून हे ॲप महत्त्वाची भूमिका बजावू शकते.

कार्यक्रमात उद्योजक कृष्णकुमार गोयल यांनीही या उपक्रमाचे कौतुक केले. तंत्रज्ञानाच्या साहाय्याने ज्येष्ठ नागरिकांना अधिक सुरक्षित आणि आत्मविश्वासपूर्ण जीवन जगण्यास मदत होईल, असे ते म्हणाले. समाजाला दिशा देणाऱ्या ज्येष्ठांना आवश्यक सुविधा सहज उपलब्ध करून देण्याची ही काळाची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.

नगरसेवक प्रशांत जगताप यांनी बदलत्या कौटुंबिक व्यवस्थेचा संदर्भ देत, संयुक्त कुटुंब पद्धती कमी होत असताना ज्येष्ठांच्या गरजांकडे विशेष लक्ष देणे आवश्यक असल्याचे सांगितले. अशा परिस्थितीत 'आएस्का'सारखे तंत्रज्ञानाधारित उपक्रम सामाजिकदृष्ट्या महत्त्वाचे ठरत असल्याचे त्यांनी म्हटले.

'आपलं घर' संस्थेचे विजय फळणीकर यांनी या ॲपमुळे अनेक ज्येष्ठांना सोबत, संवाद आणि आवश्यक मदत मिळू शकेल, असे सांगितले. समाजातील ज्येष्ठ नागरिकांच्या जीवनमानात सकारात्मक बदल घडवून आणणारा हा उपक्रम असल्याचे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमात उद्योजक एम. ए. तेजाणी, अरविंद बुधाणी, डॉ. प्रसाद आंबीकर, ॲड. प्रमोद आडकर, दिलीप पवार, महेश सूर्यवंशी यांच्यासह अनेक मान्यवरांनी मनोगत व्यक्त केले. तसेच आयएमएचे माजी अध्यक्ष डॉ. अविनाश भोंडवे, डॉ. किशोर सरपोतदार, सुनीला कवीटकर, सुहास घोडके, रवींद्र शाळू, अजित कुमठेकर यांचीही उपस्थिती होती. संस्थेच्या संस्थापक व संचालिका शकीला शेख यांनी ॲपच्या वैशिष्ट्यांची माहिती देताना सांगितले की, ज्येष्ठ नागरिकांना एका क्लिकवर मदत मिळावी यासाठी आपत्कालीन संपर्क सुविधा, आरोग्यविषयक माहिती, डिजिटल सहाय्य, सुरक्षितता सूचना, सामाजिक सहभागासाठी विविध पर्याय आणि संपर्क जाळे या सुविधा ॲपमध्ये उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. विशेष म्हणजे हे ॲप ज्येष्ठ नागरिकांसाठी पूर्णपणे मोफत उपलब्ध करून देण्यात येणार आहे. ज्येष्ठ नागरिकांचे जीवन अधिक सुरक्षित, सुलभ आणि सन्मानपूर्वक बनविण्याच्या दिशेने 'आएस्का'चा हा उपक्रम महत्त्वपूर्ण पाऊल ठरणार असल्याची भावना कार्यक्रमात व्यक्त करण्यात आली.

# पोर्शे अपघात प्रकरणात विशाल अग्रवाल पुन्हा अडचणीत; जामीन रद्द करण्यासाठी पुणे पोलिसांची न्यायालयात धाव

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** देशभरात चर्चेत आलेल्या पुणे पोर्शे अपघात प्रकरणात मुख्य अल्पवयीन आरोपीचे वडील आणि बांधकाम व्यावसायिक विशाल अग्रवाल यांच्या अडचणी पुन्हा वाढण्याची शक्यता निर्माण झाली आहे. सर्वोच्च न्यायालयाकडून जामीन मंजूर झाल्यानंतर सोशल मीडियावर समोर आलेल्या एका व्हिडिओच्या पार्श्वभूमीवर पुणे पोलिसांनी त्यांचा जामीन रद्द करण्याची तयारी सुरू केली आहे. यासाठी २३ जून रोजी सत्र न्यायालयात याचिका दाखल करण्यात येणार असल्याची माहिती पोलिस सूत्रांनी दिली. पोलिसांच्या मते, जामीन मंजूर करताना सर्वोच्च न्यायालयाने काही महत्त्वाच्या अटी घातल्या होत्या. अपघातात मृत्यू झालेल्या दोन तरुणांच्या कुटुंबीयांना कोणत्याही प्रकारचा मानसिक किंवा शारीरिक त्रास होईल, असे वर्तन टाळण्याचे निर्देश न्यायालयाने दिले होते. मात्र, जामीनानंतर सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या एका व्हिडिओमुळे या अटींचे उल्लंघन झाल्याचा दावा पोलिसांकडून करण्यात येत आहे.

तपासादरम्यान संबंधित व्हिडिओ विशाल अग्रवाल यांनी स्वतःच्या व्हॉट्सअॅप स्टेटसवर शेअर केल्याचे निष्पन्न झाल्याचा दावा पोलिसांनी केला आहे. हा स्टेटस पाहिल्याचे सांगणाऱ्या दोन व्यक्तींचे जबाब नोंदविण्यात आले असून, ते न्यायालयात पुरावा म्हणून सादर केले जाणार आहेत. याशिवाय तांत्रिक स्वरूपातील अन्य माहिती आणि डिजिटल पुरावेही पोलिसांकडून न्यायालयासमोर मांडले जाणार असल्याचे सांगितले जात आहे.

पोलिसांचे म्हणणे आहे की, संबंधित व्हिडिओ जुना असला तरी तो जामीन मिळाल्यानंतर सार्वजनिकरित्या प्रसारित करण्यात आला. अपघातातील मृत तरुणांच्या कुटुंबीयांवर अजूनही या घटनेचे मानसिक परिणाम कायम असताना अशा स्वरूपाचा व्हिडिओ प्रसारित करणे संवेदनशीलतेच्या विरुद्ध असल्याचा दावा पोलिसांनी केला आहे. त्यामुळे या कृतीमुळे पीडित कुटुंबीयांच्या भावना दुखावल्या गेल्या असून, हे जामिनाच्या अटींशी विसंगत असल्याचे पोलिसांचे म्हणणे आहे. दुसरीकडे, विशाल अग्रवाल यांच्या वतीने हे आरोप फेटाळण्यात आले आहेत. संबंधित व्हिडिओ हा एप्रिल २०२३ मधील असून तो अपघाताच्या घटनेपूर्वीचा असल्याचा दावा त्यांच्या बाजूने करण्यात आला आहे. जामीन मिळाल्यानंतर कोणताही आनंदोत्सव साजरा करण्यात आलेला नाही आणि व्हायरल होत असलेल्या दाव्यांमध्ये तथ्य नसल्याचे त्यांचे म्हणणे आहे. मात्र, पोलिसांनी हा युक्तिवाद स्वीकारण्यास नकार दिला आहे. व्हिडिओचे चित्रीकरण कधी झाले यापेक्षा तो जामीनानंतर कोणत्या उद्देशाने आणि कोणत्या माध्यमातून प्रसारित करण्यात आला, हा मुद्दा अधिक महत्त्वाचा असल्याचे पोलिसांचे मत आहे. त्यामुळे न्यायालयात जामीन रद्द करण्यासाठी सादर होणाऱ्या याचिकेत हा मुद्दा ठळकपणे मांडला जाणार आहे. आता २३ जून रोजी न्यायालयात होणाऱ्या सुनावणीकडे सर्वांचे लक्ष लागले असून, पोलिसांच्या याचिकेवर न्यायालय कोणती भूमिका घेते, याबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे. पोर्शे अपघात प्रकरण आधीच देशभरात चर्चेचा विषय ठरले असल्याने या नव्या घडामोडींनंतर प्रकरणाला आणखी एक नवे वळण मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# पिंपरी-चिंचवडच्या प्रलंबित महसूल व वनविभागीय प्रश्नांवर महसूल मंत्र्यांची बैठक

## २२ जून रोजी मंत्रालयात उच्चस्तरीय आढावा; आमदार महेश लांडगे यांच्या पाठपुराव्याला यश

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड शहराच्या विकासाशी संबंधित महसूल, वन विभाग, भूमी अभिलेख तसेच गावठाण हद्दीतील अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या प्रश्नांवर २२ जून रोजी मंत्रालयात उच्चस्तरीय बैठका होणार आहेत. राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या बैठकीत विविध प्रलंबित विषयांचा सविस्तर आढावा घेऊन आवश्यक निर्णय घेतले जाणार आहेत.

सकाळी ११ वाजता महसूल व वन विभागाशी संबंधित विषयांवर बैठक होणार असून वनविभागाशी संबंधित प्रश्न तसेच हिंजवडी ते नवी सांगवी नदी सुधार प्रकल्पाच्या अनुषंगाने खडकी, डुडुळगाव, चऱ्होली बुद्रुक आणि तळवडे येथील गावठाण हद्दीतील प्रश्नांवर चर्चा होणार आहे. सायंकाळी ५ वाजता महसूल विभागाच्या बैठकीत भूमी अभिलेख विभागातील पिंपरी-चिंचवड नवनगर कार्यालयाशी संबंधित प्रकरणे आणि विविध गावठाण हद्दीतील प्रलंबित विषयांचा आढावा घेतला जाणार आहे.

या बैठकींना आमदार महेश लांडगे, महसूल व वन विभागाचे वरिष्ठ अधिकारी, पुणे विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, पिंपरी-चिंचवड महापालिका आयुक्त तसेच संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित राहणार आहेत. शहरातील अनेक विकास प्रकल्प वन, महसूल, भूमी अभिलेख आणि प्रशासकीय प्रक्रियांमुळे रखडले आहेत. या पार्श्वभूमीवर सर्व विभागांना एकत्र आणून निर्णय प्रक्रियेला गती देण्यासाठी आमदार महेश लांडगे यांनी शासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला होता. या बैठकीत प्रलंबित मंजुरी, प्रशासकीय अडथळे आणि विकासकामांबाबत स्पष्ट निर्देश दिले जाण्याची अपेक्षा असून शहरातील अनेक महत्त्वाचे प्रश्न मार्गी लागण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## सारांश वृत्त

### उरुळी कांचन गर्भपातप्रकरणी डॉक्टरला २१ पर्यंत पोलिस कोठडी

**पुणे :** बेकायदेशीर गर्भपात केल्याप्रकरणी उरुळी कांचन पोलिसांनी एका डॉक्टरला अटक केली असून, न्यायालयाने त्याला २१ जूनपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे. डॉ. तुकाराम यशवंत मोटे (वय ५२) असे पोलिस कोठडी सुनावण्यात आलेल्याचे नाव आहे. याप्रकरणी मोटे याच्या पत्नीवरही गुन्हा दाखल केला आहे. याबाबत ग्रामीण रुग्णालयाच्या वैद्यकीय अधीक्षकांनी फिर्याद दिली आहे. ९ जानेवारी २०२५ ते १४ एप्रिल २०२६ या कालावधीत उरुळी कांचन येथील माहेर रुग्णालयात ही घटना घडली.

फिर्यादी यांनी पथकासह केडगाव येथील लवंगारे रुग्णालयात बेकायदा गर्भपात प्रकरणी तपासणी केली असता, रुग्णालयातील रजिस्टरमधील माहितीवरून एका महिला रुग्णाशी संपर्क साधला असता ती डॉ. मोटे यांच्या माहेर रुग्णालयात दाखल होती. त्यामुळे गर्भपाताचा संशय बळावल्याने पथकाने माहेर रुग्णालयात तपासणी केली असता, रुग्णालयात ९ जानेवारी २०२५ ते १४ एप्रिल २०२६ या कालावधीत गर्भपाताच्या नोंदी अद्ययावत ठेवलेल्या नसून, काही नोंदी संशयित आढळून आल्या आहेत.

### डॉ. प्रदीप कुरुलकरविरुद्ध दोषारोप निश्चित

**पुणे :** पाकिस्तानी गुप्तहेर महिलेला देशाची गोपनीय माहिती पाठविल्याप्रकरणी न्यायालयीन कोठडीत असलेला संरक्षण, संशोधन व विकास संस्थेचा (डीआरडीओ) माजी संचालक डॉ. प्रदीप कुरुलकर याच्याविरुद्ध गुरुवारी (दि. १८) ऑफिशियल सिक्रेट्स अ‍ॅक्ट, १९२३ अंतर्गत दोषारोप निश्चित करण्यात आले. त्यामुळे खटला सुनावणीला सुरुवात होण्याचा मार्ग मोकळा झाला असून, जुलैच्या दुसऱ्या आठवड्यापासून सुनावणीला सुरुवात होणार आहे.

'हनी ट्रॅप'मध्ये अडकून झारा दासगुप्ता नावाच्या पाकिस्तानी महिला हेरास देशाच्या सुरक्षेच्या दृष्टीने महत्त्वाची माहिती दिल्याच्या आरोपावरून डॉ. कुरुलकर याच्याविरोधात शासकीय गुपिते अधिनियमाच्या कलमांनुसार मुंबई येथील काळाचौकी ठाण्यात गुन्हा दाखल आहे.

# सुस्तावलेला मान्सून सक्रीय होतोय, पावसाचा जोर वाढणार! ढगांची पुन्हा गर्दी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** भारतातील अनेक राज्यांमध्ये गेल्या जवळपास दोन आठवड्यांपासून मॉन्सूनची प्रगती मंदावली होती आणि खरिपाचा हंगाम असतानाच पावसाची तूट वाढत चालली होती. मात्र, आता मॉन्सून पुन्हा सक्रिय होण्याची चिन्हे दिसत आहेत. कारण आता मान्सूनचा पाऊस घेऊन येणारे ढग तयार होऊ लागले आहेत.


हवामान तज्ज्ञांच्या अंदाजांनुसार, मध्य भारतात पाऊस घेऊन येणार ढग हळूहळू पुन्हा जोर धरतील. त्यामुळे सर्वदूर मान्सूनचा पाऊस पडण्याची प्रतीक्षा करणाऱ्या महाराष्ट्रासह सर्वच राज्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.

विदर्भात पाऊस पडणार

भारतीय हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, १९ जून ते २५ जून दरम्यान छत्तीसगड, पूर्व मध्य प्रदेश, पश्चिम मध्य प्रदेश आणि विदर्भात विखुरलेल्या स्वरूपात ते काही ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता आहे.

मॉन्सून संथ गतीमुळे पुढे सरकत असल्याने पश्चिम आणि मध्य भारतातील राज्यांना मोठा फटका बसला आहे. पण, आता हळूहळू परिस्थिती अनुकूल होत असून, मध्य भारतासाठी हा बदल एक महत्त्वाचे वळण ठरू शकतो.

हवामान तज्ज्ञांच्या मते, मान्सूनचा पाऊस घेऊन येणाऱ्या ढगांचे हे पुनरागमन अत्यंत महत्त्वाचे आहे; कारण मॉन्सूनचे अधिकृत आगमन होऊनही मध्य प्रदेश, महाराष्ट्र आणि छत्तीसगडमधील मोठ्या भागामध्ये निरभ्र आकाश आणि तीव्र उष्णता पाहायला मिळत होती.



पाऊस आणि वादळी वाऱ्यांची शक्यता

हवामान विभागाने महाराष्ट्रासह इतर राज्यांतील काही भागात विजांच्या कडकडाटासह वादळी पावसाचा अंदाजही वर्तवला आहे.

पश्चिम मध्य प्रदेश : २१ जून ते २३ जून दरम्यान ताशी ४०-५० किमी वेगाने (कमाल ६० किमी प्रतितास) वादळी वारे आणि विजांच्या कडकडाटासह पाऊस होण्याची शक्यता आहे.

पूर्व मध्य प्रदेश : २० जून ते २३ जून दरम्यान अशीच परिस्थिती राहण्याची शक्यता आहे.

विदर्भ : १९ जून ते २३ जून दरम्यान विजांच्या कडकडाटासह पावसाचा अंदाज आहे.

छत्तीसगडमध्ये १९ जून ते २३ जून दरम्यान वादळी पाऊस आणि विजांचा कडकडाट होण्याची शक्यता असून, २२ आणि २३ जून रोजी पावसाचा जोर अधिक असेल.

व्यापक स्वरूपातील पाऊस सुरू होण्यापूर्वी, काही भागांत मॉन्सूनपूर्व तीव्र हवामानाचा अनुभव येऊ शकतो. हवामान विभागाने १९ आणि २० जून रोजी पश्चिम मध्य प्रदेशात ५०-६० किमी प्रतितास वेगाने (कमाल ७० किमी प्रतितास) वादळी वारे वाहण्याचा इशारा दिला आहे. पूर्व मध्य प्रदेशातही १९ जून रोजी अशीच परिस्थिती राहण्याचा अंदाज आहे.

इतर राज्यांमध्येही मॉन्सूनची प्रगती

मॉन्सूनचे हे पुनरागमन केवळ मध्य भारतापुरते मर्यादित राहणार नाही. येत्या आठवड्यात दक्षिण भारतातील राज्यांत देशातील सर्वाधिक पाऊस पडेल, असा अंदाज आहे.

कर्नाटक : किनारपट्टीवरील कर्नाटकात २१ ते २५ जून दरम्यान मुसळधार पावसाचा अंदाज असून, उत्तर आणि दक्षिण अंतर्गत कर्नाटकात २२ आणि २३ जून रोजी तीव्र पाऊस पडू शकतो.

सुरुवातीच्या जोरदार आगमनानंतर रेंगाळलेला मॉन्सून आता पुन्हा एकदा सर्वदूर पसरण्यासाठी दिशेने सक्रीय होत असल्याचे या अंदाजावरून दिसून येते.

उत्तर आणि मध्य भारताच्या अनेक भागांत अजूनही मोठ्या प्रमाणावर मुसळधार पाऊस सुरू झालेला नसला, तरी वाढती ढगांची गर्दी आणि वादळाची स्थिती पाहता, आगामी दिवसांत मॉन्सून पुढे सरकण्यासाठी वातावरण अनुकूल होत असल्याचे स्पष्ट होत आहे.

# पात्र वेटिंगवर, अपात्रांना लॉटरी?

## कल्याण - डोंबिवली महापालिकेच्या अग्निशमन विभागातील कारभार आला चव्हाट्यावर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** कल्याण डोंबिवली महापालिकेच्या अग्निशमन विभागातील पात्र असलेल्या १६ लिडिंग फायरमन यांची पदोन्नती जाणीवपूर्वक रोखण्यात आली आहे. तर नियम डावलून काही जणांना पदोन्नती दिली असल्याची धक्कादायक बाब माहिती अधिकारात उघड झाली आहे.

या प्रकरणी उपायुक्त वंदना गुळवे यांनी महापालिकेच्या महासभेत दिशाभूल करणारी माहिती दिल्याचा आरोप काँग्रेस गटनेत्या कांचन कुलकर्णी यांनी केला. या प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी कुलकर्णी यांनी केली आहे.

नुकत्याच पार पडलेल्या महापालिकेच्या महासभेत अग्निशमन विभागातील पदोन्नतीचा मुद्दा उपस्थित केला गेला. शिंदेसेनेच्या नगरसेविका शालिनी वायले यांनी यासंदर्भात प्रस्ताव सूचना मांडत पात्र कर्मचाऱ्यांना पदोन्नती का देण्यात आली नाही? असा प्रश्न उपस्थित केला. यावर उत्तर देताना उपायुक्त गुळवे यांनी संबंधित कर्मचाऱ्यांकडे जड वाहन चालविण्याचा परवाना नसल्याने त्यांची पदोन्नती रखडल्याचे सांगितले. मात्र ही माहिती वस्तुस्थितीशी विसंगत असल्याचा आरोप कुलकर्णी यांनी केला आहे. असल्याचा कुलकर्णी यांच्या मते, पदोन्नतीसाठी पात्र असलेले कर्मचारी हे लिडिंग फायरमन पदासाठी पात्र आहेत. या पदासाठी जड वाहन चालविण्याचा परवाना आवश्यक कोणताही शासन निर्णय किंवा नियम अस्तित्वात नाही. जड वाहन परवाना हा चालक पदासाठी आवश्यक असतो, लिडिंग फायरमन पदासाठी नव्हे, असा त्यांचा दावा आहे.



### पालिका प्रशासनाची भूमिका संशयास्पद

याशिवाय काही कर्मचाऱ्यांची पदोन्नती यापूर्वीच करण्यात आली, मात्र त्याच निकषांवर इतर पात्र कर्मचाऱ्यांना पदोन्नती नाकारण्यात आली. त्यामुळे प्रशासनाची भूमिका संशयास्पद असल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

### उपायुक्तांवर कारवाई करण्याची मागणी

पदोन्नतीच्या प्रतीक्षेत असलेल्या काही कर्मचाऱ्यांची निवृत्ती अवघ्या काही महिन्यांवर आली असून त्यांना त्यांच्या हक्काची पदोन्नती मिळालेली नाही. हा कर्मचाऱ्यांचा अधिकार असून ३ त्यावर अन्याय होऊ नये, अशी भूमिका कुलकर्णी यांनी मांडली.

माहितीच्या अधिकाराखाली ३ मागवलेल्या माहितीत आणि प्रशासनाने सभागृहात दिलेल्या माहिती पूर्णपणे विसंगत आहे. या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करून उपायुक्त गुळवे यांच्यावर कठोर कारवाई करावी, अशी मागणीही त्यांनी केली आहे.

## 'आरटीई'साठी तारीख पे तारीख, तरीही तब्बल दहा हजार जागा रिक्त

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** आर्थिकदृष्ट्या दुर्बल, गरजू विद्यार्थ्यांना देखील दर्जेदार शिक्षण घेता यावे म्हणून आरटीई अर्थात शिक्षण हक्क कायद्याअंतर्गत नामांकित शाळेत प्रवेश दिला जातो. यात पात्र विद्यार्थ्यांना प्रवेश निश्चितीसाठी मुदत दिली जाते. यंदा अपेक्षित प्रवेश झालेलेच नाहीत. परिणामी प्रवेशप्रक्रियेसाठी वारंवार मुदतवाढ दिली गेली, त्यानंतरही राज्यात तब्बल ९ हजार ९२८ जागा रिक्त आहेत.

आरटीई अंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल व वंचित घटकांतील विद्यार्थ्यांना खासगी विनाअनुदानित शाळांमध्ये २५ टक्के राखीव जागांवर प्रवेश दिला जातो. यासाठी यंदाच्या प्रवेश प्रक्रियेसाठी राज्यभरातून २ लाख ८९ हजार २८६ विद्यार्थ्यांनी ऑनलाइन नोंदणी केली होती. त्यापैकी १ लाख ५ हजार ८११ विद्यार्थ्यांची निवड यादी जाहीर करण्यात आली होती.

नियमित निवड फेरीत ७९ हजार ७७६ विद्यार्थ्यांना प्रवेशाची संधी मिळाली. त्यानंतर रिक्त जागांसाठी प्रतीक्षा यादीतील विद्यार्थ्यांना संधी देण्यात आली. पहिल्या प्रतीक्षा यादीतून १२ हजार ९५० विद्यार्थ्यांची निवड केली, तर दुसऱ्या प्रतीक्षा यादीतून ३ हजार १५७ विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी पात्र ठरविले आहे. यांना प्रवेश घेण्याची मुदत १९ जूनपर्यंत वाढवून दिली होती. त्यानंतरही राज्यभरातील ९ हजार ९२८ जागा रिक्त राहिल्या आहेत. अनेक पालकांनी प्रवेश प्रक्रिया पूर्ण न केल्याने किंवा कागदपत्रांची पूर्तता न झाल्याने या जागा रिक्त राहिल्याचे समोर येत आहे.

# मोबाईल हिसकावून काढत होते पळ, रस्त्यातच चोराचा हार्ट अटॅकने मृत्यू

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**बंगळुरू :** एका व्यक्तीच्या हातातील मोबाईल हिसकावून पळ काढत असलेल्या चोरट्याचा भर रस्त्यात हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने मृत्यू झाल्याची घटना बंगळुरूमध्ये घडली आहे. येथील कब्बनपेट परिसरामध्ये दोन तरुणांनी एका वाटसरूच्या हातातील फोन हिसकावून पळण्याचा प्रयत्न केला. यादरम्यान, आजूबाजूला असलेल्या लोकांनी या चोरांना रोखण्याचा प्रयत्न केल्याने चोरट्यांचा दुचाकीवरून तोल गेला. यातील एक आरोपी काही अंतरावर जाऊन पडला. तसेच तिथेच त्याचा मृत्यू झाला. तर दुसऱ्या आरोपीला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

ही संपूर्ण घटना कब्बनपेट परिसरात घडली. याबाबत मिळालेल्या अधिक माहितीनुसार दोन तरुण दुचाकीवरून आले. तसेच रस्त्यावरून चालत असलेल्या व्यक्तीच्या हातातून मोबाईल हिसकावून पळू लागले. तेव्हा पीडितांनी आरडाओरडा करण्यास सुरुवात केली. त्याचवेळी तिथे काम करत असलेल्या एका कामगाराने प्रसंगावधान राखत या बदमाशांना रोखण्यासाठी त्यांच्या दिशेने एक गोणी भिरकावली. ही गोणी लागताच दुचाकीचा तोल गेला.

दरम्यान, पकडले जाऊ या भीतीने या आरोपींनी चोरलेला मोबाईल तिथेच फेकला. तसेच दुचाकी तिथेच सोडून पळू लागले. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार आरोपींपैकी जुनैद नावाच्या आरोपीला हृदयविकाराचा त्रास होता. पकडले जाऊ या भीतीने आणि पळण्याच्या गडबडीत त्याला हृदयविकाराचा तीव्र झटका आला. तसेच फुटपाथवर काही अंतरावर जाऊन तो पडला. तसेच तिथेच त्याचा मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी पोहोचले. तसेच त्यांनी दुसरा आरोपी असलेल्या अरबाज याला ताब्यात घेतले.

# आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन

## नागरिकांनी योग दिनात सहभागी होऊन आरोग्यदायी जीवनशैलीचा संकल्प करावा : जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**बीड :** आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त दि.२१ जून रोजी जिल्हाभर विविध ठिकाणी सामूहिक योग प्रात्यक्षिकांचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्हास्तरीय मुख्य कार्यक्रम सकाळी ६.३० वाजता जिल्हा क्रीडा संकुल, बीड येथे होणार आहे. तरी नागरिकांनी मोठ्या संख्येने योगाचा संदेश घराघरात पोहोचवावा यासाठी योग दिनात सहभागी होऊन आरोग्यदायी जीवनशैलीचा संकल्प करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी केले आहे.



योग दिनाच्या पूर्वतयारीबाबत जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर, प्राथमिक शिक्षणाधिकारी भगवान सोनवणे, उपशिक्षणाधिकारी देवकते, क्रीडा अधिकारी अनिकेत काळे, कालिदास होसूरकर, सतीश राठोड आदी उपस्थित होते. जिल्ह्यातील सर्व तालुकास्तरावरही मोठ्या प्रमाणावर योग दिनाचे आयोजन करण्यात येणार आहे. या उपक्रमात प्रशासनासोबत पतंजली योगपीठ, योगा असोसिएशन, विविध योग संघटना तसेच सामाजिक संस्था सक्रिय सहभाग घेणार आहेत. या कार्यक्रमात अधिकारी, कर्मचारी, लोकप्रतिनिधी, योग साधक, विद्यार्थी, युवक-युवती तसेच सर्वसामान्य नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवावा. संयुक्त राष्ट्रसंघाने २१ जून हा दिवस आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून घोषित केला आहे. भारताची हजारो वर्षांची योग परंपरा आज जगभर पोहोचली असून शारीरिक व मानसिक आरोग्य संवर्धनासाठी योग महत्त्वपूर्ण ठरत आहे. याच पार्श्वभूमीवर सकाळी ६.३० ते ८ वाजेदरम्यान सामूहिक योग प्रात्यक्षिके, जनजागृती उपक्रम आणि योगाचे महत्त्व पटवून देणारे कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहेत. तालुकास्तरावरील कार्यक्रमांच्या नियोजनासाठी तहसीलदार यांची नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली असून गटविकास अधिकारी सहनोडल अधिकारी तर गटशिक्षणाधिकारी सहाय्यक नोडल अधिकारी म्हणून जबाबदारी पार पाडणार आहेत.

## दिल्लीत २३ जूनला इराण, चीन, रशिया अन् भारताचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागारांची महत्त्वाची बैठक

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** २३ जून रोजी नवी दिल्लीत होणाऱ्या ब्रिक्स देशांच्या राष्ट्रीय सुरक्षा सल्लागारांच्या बैठकीला चीनचे परराष्ट्र मंत्री वांग यी, रशियाच्या सुरक्षा परिषदेचे सचिव सर्गेई शोइगु आणि इराणचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार मोहम्मद बाघेरी झोलघदजार उपस्थित राहणार आहेत. मध्य पूर्वेतील संघर्ष संपवण्याच्या उद्देशाने झालेल्या अमेरिका-इराण शांतता करारानंतर तेहरानचा हा पहिला मोठा आंतरराष्ट्रीय कार्यक्रम असेल.

अमेरिका-इराण करार आणि संयुक्त अरब अमिरात **(UAE)** व इराण यांच्यातील शत्रुत्व संपवण्याच्या कथित करारानंतरची ही पहिली ब्रिक्स सुरक्षा बैठक असेल. या घडामोडींमुळे भारताच्या अध्यक्षतेखाली १२-१३ सप्टेंबर रोजी नवी दिल्लीत होणाऱ्या ब्रिक्स शिखर परिषदेपूर्वी सदस्य देशांमध्ये एकमत निर्माण होण्यास मदत होऊ शकते. पश्चिम आशियातील संघर्षानंतर झालेल्या पूर्वीच्या ब्रिक्स बैठका इराण आणि संयुक्त अरब अमिरात यांच्यातील मतभेदांमुळे संयुक्त निवेदन जारी करण्यात अयशस्वी ठरल्या होत्या. या बैठकीत सीमापार दहशतवाद आणि इतर आंतरराष्ट्रीय सुरक्षा आव्हानांना तोंड देण्याच्या उपाययोजनांवर लक्ष केंद्रित केले जाईल. इराणच्या राष्ट्रीय सुरक्षा सल्लागारांच्या उपस्थितीमुळे भारताला शांतता करारातील बारकावे आणि भारत-इराण आर्थिक संबंधांवर होणारा त्याचा परिणाम अधिक चांगल्या प्रकारे समजून घेण्याची संधी मिळण्याची अपेक्षा आहे. इकॉनॉमिक टाइम्सनं हे वृत्त प्रसारित केले आहे.

# नसरापूर चिमुकली अत्याचार-खून प्रकरणाचा निकाल २५ जून रोजी लागणार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** नसरापूर येथील तीनवर्षीय चिमुकलीचे अपहरण, लैंगिक अत्याचार आणि हत्या प्रकरणात मुलीचा शवविच्छेदन अहवाल, वैद्यकीय दाखले आणि तिच्या शरीरावरील जखमांचे सविस्तर विश्लेषण करून आरोपीच्या ताब्यात असताना ३९ मिनिटांत झालेल्या तिच्यावरील अत्याचारांचे पुरावे सरकारी पक्षाने शनिवारी (दि. २०) न्यायालयात सादर केले.

सीसीटीव्ही फुटेज, डीएनए रिपोर्ट आणि अन्य पुराव्यांच्या आधारे आरोपीचा खोटेपणा उघडा पाडत, त्यांनी संपूर्ण दोषारोप सिद्ध करत आरोपीला कठोर शिक्षा व्हावी, अशी मागणी विशेष सरकारी वकील अजय मिसर यांनी केली. या प्रकरणाचा शनिवारी (दि. २०) सरकारी व बचाव पक्षाचा युक्तिवाद पूर्ण झाला. येत्या २५ जून रोजी खटल्याचा निकाल लागणार आहे.

हा खटला राज्यातील सर्वांत जलदगतीने चालविलेला ठरेल. १६ दिवसात दोषारोपपत्र; १६ दिवसांत साक्षी व पुरावे आणि २० दिवसांत अंतिम युक्तिवाद पूर्ण होऊन महिन्याभरातच निकाल लागणार आहे. आरोपीला काय शिक्षा होते याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

या प्रकरणाची सुनावणी जिल्हा व सत्र न्यायालयातील विशेष न्यायाधीश एस. आर. साळुंखे यांच्या न्यायालयात सुरू आहे. अंतिम युक्तिवादाप्रसंगी अ‍ॅड. मिसर, सहकारी अ‍ॅड. प्रथमेश शिंगणे यांनी सर्वोच्च न्यायालयाचे न्यायनिवाडे न्यायालयासमोर ठेवले. यावेळी आरोपी भीमराव कांबळे हा व्हिडीओ कॉन्फरसिंगच्या माध्यमातून न्यायालयात हजर होता.



पीडितेच्या मृत्यूनंतरही आरोपीने निर्लज्जपणे तिच्या मृतदेहावर अत्याचार केले. त्याने केलेले कृत्य कोणत्याही रागात नव्हे, तर अतिशय थंड डोक्याने, विचारपूर्वक आणि केवळ वासनेपोटी केले आहे. अशा क्रूर कृत्यामुळे समाजावर अत्यंत विपरीत आणि घातक परिणाम होऊ शकतो, याकडे अ‍ॅड. मिसर यांनी लक्ष वेधले.

आरोपी भीमराव कांबळे याने पीडितेला दुपारी ३ वाजून १२ मिनिटांनी घटनास्थळी नेले. ३ वाजून ५१ मिनिटांनी तो घटनास्थळावरून एकटाच परत येत असल्याचे त्या ठिकाणच्या सीसीटीव्ही फुटेजमधून स्पष्ट होते. या तांत्रिक पुराव्यावरून पीडिता ही तब्बल ३९ मिनिटे आरोपीच्या ताब्यात होती, हे सिद्ध होते.

आरोपीवर लावलेल्या प्रत्येक कायदेशीर कलमाची व्याख्या स्पष्ट करत तपास यंत्रणेने संकलित केलेल्या ६ अत्यंत महत्त्वपूर्ण सीसीटीव्ही फुटेजचा आधार घेत गुन्ह्याचा घटनाक्रम मांडला. त्याने पीडितेवर अत्यंत पाशवी अत्याचार व अनैसर्गिक संभोग केला. त्यानंतर, तिची निर्घृण हत्या करून मृतदेह लवपून ठेवल्याची माहिती विशेष सरकारी वकील अजय मिसर यांनी न्यायालयाला दिली. कांबळे याने न्यायालयात स्वतःच्या बचावासाठी मांडलेली कहाणी तथ्यहीन असल्याचे विशेष सरकारी वकिलांनी पुराव्यांसह स्पष्ट केले. वैद्यकीय अहवाल आणि डीएनए प्रोफाइलिंगच्या वैज्ञानिक पुराव्यांच्या आधारे आरोपीचा गुन्ह्यातील सहभाग निर्विवादपणे सिद्ध करण्यात आला.

### हे ठरले महत्त्वाचे पुरावे

- **गुन्ह्यापूर्वी आरोपीने घटनास्थळ व परिसरातील घरांची रेकी केल्याचे सीसीटीव्ही फुटेजमधून स्पष्ट झाले.**
- **मुख्य साक्षीदार आणि बालसाक्षीदारांनी दिलेले जबाब सरकार पक्षासाठी महत्त्वाचे आणि कायदेशीरदृष्ट्या भक्कम ठरले.**
- **घटनास्थळ पंचनामे, आरोपीची ओळख परेड, जप्त मुद्देमाल आणि रासायनिक विश्लेषण अहवाल यांमधून गुन्ह्याची साखळी सिद्ध झाली.**
- **तपासातील 'चेन ऑफ कस्टडी' अखंड असल्याने पुराव्यांमध्ये कोणतीही छेडछाड झालेली नसल्याचेही स्पष्ट झाले.**